संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# सद्गुरू तेचि परब्रह्म

**महाराष्ट्राच्या** पुण्यभूमीत भक्तीची गंगा सर्वांनाच पावन करीत असते. शेकडो वर्षांपासून चालू असलेली पंढरपूर वारीची परंपरा अंखडपणे सुरू आहे. यंदाची पंढरपूरची वारी आता शेवटच्या टप्प्यात येऊन पोहचली आहे. या सगळया विठ्ठल भक्तांना मनुष्य जन्माचे सार्थक कशात आहे याची अनुभूती या वारीतून मिळते. कोणत्याही समाजामध्ये एखादी परंपरा शेकडो वर्ष कशी टिकते.तर ती निःस्वार्थी निष्ठेच्या पायावर उभी असते. याच निष्ठेतून पंढरपूरच्या वारीच्या निमित्ताने गुरुचेही महत्व किती मोठे आहे हे समोर येते.पारमार्थिक लोक गुरुविना परमार्थाची सफलता असंभाव्य मानतात.ज्यांना साक्षात गुरुबोध होऊ शकला नाही त्यांच्या जीवनात देवच गुरुरुपाने प्रकट झाल्याच्या कथा अथवा गुरुने स्वप्नबोध दिल्याच्या कथा संतचरित्रपर वाङ्मयताच नव्हे तर प्रत्यक्ष संतांच्या वाणीतही प्रकटलेल्या आढळतात.समग्र संत साहित्य गुरुगौरवाने भारलेले आहे. संतसाहित्यातील अशी एकही कृती दाखविता येणार नाही की, जी गुरुगौरवाने रंगलेली नाही. जो मुमुक्षू आहे त्याला गुरु हवाच. गुरुविना मोक्षाची वाट चोखाळणे सर्वस्वी अशक्य आहे अशी दृढ श्रध्दा पारमार्थिकांच्या ठायी आढळते. गुरुला ते सर्वस्व मानतात. परमेश्वराहून श्रेष्ठ मानतात. आपले जीवितच नव्हे तर जीवितसाफल्यही गुरुचरणी अर्पण करतात. मराठी संतपरंपरेचे आद्याचार्य आणि मराठी संतकविमंडळाचे कुलगुरु श्रीज्ञानदेव यांचे ज्येष्ठ बंधूच त्यांचे गुरू होते. परंतु तरीही ज्ञानदेवांच्या ओवीओवीतून जो गुरुगौरव ओसंडून वाहत आहे तो बंधुत्वाच्या पार्थिव नात्यामुळे कुठेही मर्यादित झालेला नाही. आपल्या प्रज्ञेचे, प्रतिभेचे नि परमानुभूतीचे सारे श्रेय त्यांनी गुरुकडे दिले आहे. त्यांच्या गुरुगौरवाचा एक असाधारण विशेष हा आहे की गुरुला त्यांनी अनेकवार माऊलीच्या रूपात वर्णिले आहे. गुरुला गुरुमारुली म्हटले आहे. संतांना जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त होण्याच्या म्हणजेच मरणाकडे धावणाऱ्या इहजन्मांचा संस्कार पुसण्याची ओढ होती हे उघड आहे. याचाच अर्थ असा की, पार्थिव जन्म पुसुन अपार्थिव पातळीवरचा नवा अमृत जन्म त्यांना हवा होता. हा नवा जन्म सद्गुरू देतो म्हणून तर त्यांनी त्याला माऊली म्हटले आहे. तरीही प्रश्न असा उपस्थित होतो की गुरू ही संज्ञा जर पुल्लिंगी आहे तर त्याची शिष्यजीवनातली भूमिका जनकाची असावी हे ठीक आहे. पण ती जननीची कशी होऊ शकते त्याचा माऊली म्हणून गौरव का व्हावा गुरुगौरवाच्या या गूढावर प्रकाश टाकला आहे.

## गुरूदिक्षेतून नवा जन्म

सत्त्ववृध्दीची कारणे सांगताना जन्म या पदावर जे भाष्य लिहिले आहे ते गुरुगौरवाचे गूढ उकलणारे आहे. सत्त्ववृध्दी साधायची असेल तर जननीजठरातून लाभलेला जन्म पुसून गुरुदिक्षेतून नवा जन्म प्राप्त करायला हवा असे नाथांचे म्हणणे आहे.

गुरुपासोनि दीक्षाग्रहण। ते पुरुषासी नवे जन्म जाण।
गुरु मायबाप संपूर्ण। तें एक लक्षण उध्दवा।
उपजलिया बाळकासी तत्वतां।पंचविध जाण पिता।
जनिता आणि उपनेता । तिजा प्रतिपाळिता अन्नदानें।।
जो भयापासूनि सोडविता। जो बांधकिमोचन करविता।।
जो देहाचे मरण चुकविता। तोही पिता शास्त्रर्थे।।
यावेगळा पांचवा पिता। जो झाडणी करी पंतभुता।।
मृत्यूपासून सोडविता। जो गर्भव्यथा निवारी।
ज्याचे देखिलिया चरण। बांधू न शके भववर्धन।
तो सदगुरु पिता जाण। भाग्येवीण न पाविले।।

जीवनाचे परमश्रेय प्राप्त करू पाहणाऱ्या साधकाच्या जीवनात गुरूचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याचे नाथांच्या दृष्टिने कारण असे की- गुरूपासून दीक्षाग्रह केल्यानंतर पुरुषाला नवा जन्म लाभतो. गुरू हे माता आणि पिता या दोन्हीचे संपूर्ण रूप आहे. जन्म देणारा, सांभाळ करणारा, अन्नदाने पोसणारा, संकटहरण करणारा आणि सद्गुरू असे जे पाच जनक असतात त्यापैकी पाचवा जनक सद्गुरू हा भवबंधनच तोडून टाकतो. नाथांनी सांगितलेल्या या पंचविध पित्यापैकी प्रतिपालन करणारा आणि संकटहरण करणारा या दोघांना पिता म्हटले आहे. ते केवळ कृतज्ञतेपोटी हे आपल्या सहज ध्यानी येते. या तीन जन्मदात्यांनी दिलेल्या जन्मांची श्रेणी उत्तरोतर चढती मानली गेली आहे त्यामुळे जन्म देणाऱ्यापेक्षा सांभाळ करणारा श्रेष्ठ आणि सांभाळ करणाऱ्यापेक्षाही सद्गुरू श्रेष्ठ अशी धारणा जनमानसात नांदत आलेली आहे. सद्गुरूच्या ठायी मातृ पितृ तत्त्व पूर्णांशाने एकरूप होऊन प्रकटले आहे आणि सद्गुरू हा जनक पित्यांहून वेगळा व श्रेष्ठ कसा आहे हे नाथांनी एकनाथी भागवतात स्पष्ट केले आहे.

## गुरुगौरवाचे गुढ

मनुष्याला जन्म देणारे माता पिता वेगळे असतात आणि अगदी आगळ्या वेगळ्या रूपात मातृपितृ तत्वांचा पूर्णतः एकरूप आविष्कार घडविणारा आणि स्थूल जन्माच्या पलिकडचा दिव्य जन्म देणारा सदगुरु हा साधकाला पित्याहून श्रेष्ठ वाटणे स्वाभाविक आहे. सद्गुरूपासून लाभणाऱ्या या नव्या दिव्य जन्माला नाथांनी दीक्षाजन्म अशी पारिभाषिक संज्ञा वापरली आहे.नाथांनी दीक्षा या शब्दांची दा म्हणजे देणे आणि क्षि म्हणजे क्षय पावणे अशी फोड करुन दिली आहे. जी चारी पुरुषार्थ व चारी मुक्ती देते.आणि जी अविद्येच्या स्थितीचा निःशेष क्षय करते. ती दीक्षा होय. सद्गुरू शैवी, वैष्णवी, अथवा निर्गुणतत्वाची दीक्षा देऊन मोक्षप्राप्तीला अधिकारी ठरणारा असा नवा जन्म प्रदान करतो. या नव्या जन्माला नाथांनी दीक्षाजन्म म्हटले आहे. हा दीक्षा जन्म देण्याच्या सामर्थ्यातच गुरुगौरवाचे गूढ लपलेले आहे. गुरूचे हे असाधारण महत्त्व सर्व पारमार्थिकांना निरपवाद स्वरूपात मान्य असल्यामुळे गुरुकडे मनुष्यबुध्दीने पाहू नये. सद्गुरू तेचि परब्रह्म या भावनेने त्यांची सेवा करावी त्यांची आज्ञा मानावी असा दंडक पारमार्थिक जीवनात सर्वत्र पाळला जातो.